


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २१९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२२ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## मोदी मंत्रिमंडळात जागा हवी, शिवसेना खासदारांची तयारी

# शिंदेंनी झापलं, आधी पक्षबांधणी, मगच पदाची अपेक्षा करा

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२१, मुंबई :**
केंद्रातील मंत्रिमंडळात काही दिवसांत फेरबदल होण्याच्या हालचाली सुरू झाल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या खासदारांनी मंत्रिमंडळात आपली वर्णी लागावी यासाठी म
ोर्चेबांधणी सुरू केली आहे.



**एकनाथ शिंदेंचा दिल्ली दौरा**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी अचानक दिल्ली गाठत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. एकनाथ शिंदे यांच्या या दिल्ली भेटीची राज्याच्या राजकारणात चांगलीच चर्चा रंगली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि एकनाथ शिंदे यांची ही दिल्लीवारी राज्यातील महत्त्वाच्या प्रश्नांसंदर्भात असल्याचे सांगितले जात आहे. या दौऱ्यात पंतप्रधानांच्या भेटीबरोबरच एकनाथ शिंदे यांनी सोमवारी रात्री दिल्लीत खासदारांच्या कामाचाही आढावा घेतल्याचे समजते. या बैठकीत काही खासदारांच्या काम गिरीबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केल्याचे समजते.

**शिंदेंनी हजेरी घेतली...**

येत्या काही दिवसांमध्ये केंद्रीय मंत्रिमंडळात खांदेपालट होणार असून, त्यानुसार आपल्याला मंत्रिमंडळात स्थान मिळावे, यासाठी शिवसेनेच्या काही खासदारांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. त्यावर या खासदारांची एकनाथ शिंदे यांनी चांगलीच हजेरी घेतल्याचे समजते. आधी पक्षसंघटना मजबूत करा, सभागृहात आक्रमकरित्या काम करता आणि मग पदाची अपेक्षा ठेवा, असे शिंदेंनी या खासदारांना सुनावल्याचे समजते.

मी महाराष्ट्रात आणि तुम्ही दिल्लीत असलात तरी माझ्याकडे तुमच्या कामकामाजी सर्व माहिती येते. तुमच्या सगळ्यांच्या कामावर माझे बारकाईने लक्ष आहे. त्यामुळे आधी काम करा आणि मग मंत्रिपदाची अपेक्षा ठेवा. पक्षाची आणि सरकारची बाजू सभागृहात जोरदारपणे मांडा. पक्षाचे प्रतिनिधित्व सभागृहात दिसण्यासाठी सभागृहात उपस्थित राहून विविध आयुधांच्या आधारे प्रश्न मांडा. काम करणाऱ्यांचा पक्षाकडून योग्य सन्मान केला जातो, तेच येथेही सर्वांना लागू होणार, असल्यलाचेही त्यांनी सांगितल्याचे समजते.

**राहुल शेवाळे नाराज...**

दरम्यान, राज्यसभेची उमेदवारी न मिळाल्याने माजी खासदार राहुल शेवाळे नाराज असल्याचे खात्रीलायकरित्या समजते. शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांच्याकडून राहुल शेवाळे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. मंगळवारी रात्री उदय सामंत हे राहुल शेवाळे यांना घेऊन दिल्लीतही गेले होते. दिल्लीत आल्यानंतर राहुल शेवाळे हे श्रीकांत शिंदे यांना भेटले. या भेटीत शेवाळे यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न झाल्याचे सम जते. राहुल शेवाळे हे पक्षात दुसऱ्या स्थानावर असून, लवकरच त्यांना केंद्रात पक्षसंघटनेची नवीन जबाबदारी दिली जाणार असल्याचे समजते.

# जितेंद्र आव्हाडांची आमदारकी रद्द करा; सकल हिंदू समाजाचे तहसीलदारांना निवेदन

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.२१, चिखली (बुलढाणा) :** छत्रपती शिवाजी महाराज, प्रभू श्रीराम आणि हिंदू संस्कृतीबद्दल सातत्याने अपमानजनक विधाने करून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या आमदार जितेंद्र आव्हाड यांची आमदारकी त्वरित रद्द करण्यात यावी, या मागणीसाठी आज चिखली येथे सकल हिंदू समाज आणि हिंदु जनजागृती समितीच्या वतीने तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले. चिखलीचे नायब तहसीलदार मुरलीधर गायकवाड तसेच मलकापूर चे नायब तहसीलदार श्री चौधरी यांनी हे निवेदन स्वीकारले.

**इतिहासाचा विपर्यास खपवून घेणार नाही:**

निवेदनात नमूद केल्यानुसार, आम दार जितेंद्र आव्हाड हे जाणीवपूर्वक इतिहासाचा विपर्यास करत असून, राज्याभिषेकासारख्या पवित्र प्रसंगाबाबत जातीय विष पसरवणारी विधाने करत आहेत. लोकशाहीचा गैरवापर करून विधीमंडळाच्या पदाची प्रतिमा मलीन करणाऱ्या अशा लोकप्रतिनिधीवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. केवळ 'दिलगिरी' व्यक्त करून वेळ म
ारून नेणाऱ्या प्रवृत्तीला आता कायमचा लगाम घालण्याची वेळ आली आहे, असा पवित्रा हिंदू संघटनांनी घेतला आहे.

**'ईशनिंदा विरोधी कायदा' करण्याची आग्रही मागणी:**

धर्म, देवता, संत आणि छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या राष्ट्रपुरुषांची विटंबना करणाऱ्यांविरोधात राज्यात तातडीने 'ईशनिंदा विरोधी कायदा' संमत करावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. वारंवार होणाऱ्या या अपमानास्पद प्रकारांमुळे शिवभक्तांच्या भावना दुखावल्या जात असून, सरकारने याकडे दुर्लक्ष करू नये, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.



**प्रशासनाकडून दखल:**

नायब तहसीलदार मुरलीधर गायकवाड तसेच मलकापूर नायब तहसीलदार श्री चौधरी यांनी निवेदन स्वीकारले असून, यातील मागण्या आणि भावना राज्य सरकारपर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले आहे.

**उपस्थित मान्यवर व कार्यकर्ते:**

निवेदन सादर करतेवेळी हिंदु जनजागृती समितीचे, प्रसाद येवले, शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानचे गणेश चव्हाण, गोरक्षक ओमराजे गायकवाड, शिवप्रतिष्ठान युवा हिंदुस्तानचे राहुल मोरे, सुजित कोरे, अनिकेत पेंढारकर, हरिभाऊ सोळंके, आकाश सांगळे, चेतन गुप्ता, संदीप ठेंग, योगेश भगत, विजय लाहोरकर, दीपक गाडेकर, तुषार भुतेकर, विशाल भुतेकर, प्रताप कंडारे, ऋषीकेश करवंदे, राकेश गोंधणे, सुनील जाधव तसेच मलकापूर चे डॉ. ज्ञानेश देशपांडे सौ भारती दहिभाते यांच्यासह सकल हिंदू समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहुरी नगरपालिकेतील अधिकाऱ्याला १ हजार रुपयांच्या लाचप्रकरणी रंगेहात अटक

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची धडक कारवाई...

**अक्षराज : प्रमोद डफळ**
**दि.२१, राहुरी :** राहुरी नगरपालिकेतील कंत्राटी सहाय्यक प्रकल्प अधिकारी बाबासाहेब किशोर राऊत (वय ४०) यांना १ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने २० मार्च २०२६ रोजी रंगेहात पकडले. या कारवाईमुळे नगरपालिकेत मोठी खळबळ उडाली असून भ्रष्टाचाराविरोधात ठोस संदेश गेला आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार व्यक्तीच्या कामासाठी आरोपी बाबासाहेब राऊत यांनी शासनाच्या राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेतून ३० हजार रुपये मंजूर करून देण्याच्या मोबदल्यात १ हजार रुपयांची लाच मागितली होती. याप्रकरणी तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. २० मार्च २०२६ रोजी तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता आरोपीने लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर सापळा रचण्यात आला आणि राहुरी नगरपालिका परिसरात तक्रारदाराकडून १ हजार रुपये स्वीकारताना आरोपीला रंगेहात अटक करण्यात आली.

या प्रकरणी राहुरी पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगरच्या पोलीस निरीक्षक छाया देवरे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या कारवाईवर पर्यवेक्षण अधिकारी म्हणून पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांनी लक्ष ठेवले. तसेच पोलीस कर्मचारी गजानन गायकवाड, वैभव बबन सुपेकर आणि सचिन नामदेव सुद्रुक यांनी या सापळा कारवाईत सक्रिय सहभाग घेतला.

या कारवाईसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी व अपर पोलीस अधीक्षक सुनील दोरगे यांचे मार्गदर्शन लाभले.

दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही शासकीय कामासाठी कोणी लाच मागितल्यास तत्काळ तक्रार करावी. अशा तक्रारींवर गोपनीयतेने आणि तातडीने कारवाई करण्यात येईल, असेही विभागाने स्पष्ट केले आहे.

## माथेरानमध्ये वाहतूक व सुविधा प्रश्न गंभीर; नागरिकांमध्ये नाराजी...

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**
**दि.२१, माथेरान :** आशियातील एकमेव वाहनमुक्त व निसर्गरम्य पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेले माथेरान आज मूलभूत सेवासुविधांच्या अभावाम
ुळे अनेक गंभीर समस्यांना सामोरे जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. पर्यटनाच्या नकाशावर जागतिक स्तरावर प्रसिद्धी मिळूनही स्थानिक नागरिक आणि पर्यटक यांना आवश्यक सोयी-सुविधांसाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.११ ऑक्टोबर २००८ रोजी तत्कालीन नगराध्यक्ष मनोज खेडकर यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेली मिनीबस सेवा आज अत्यंत दयनीय अवस्थेत पोहोचली आहे. कर्जत – माथेरान दरम्यान धावणारी ही बस अनेक वेळा घाटातच बंद पडते. तीव्र चढावावर गियर बदलण्यास होणारा विलंब आणि वारंवार होणारे तांत्रिक बिघाड यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. परिणामी, प्रवाशांना विशेषत: विद्यार्थ्यांना, व्यापाऱ्यांना आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्यांना अर्ध्या वाटेत उतरून पायपीट करावी लागते.



ही मिनीबस सेवा केवळ प्रवासाचे साधन नसून अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आधार ठरली आहे. नेरळ आणि कर्जत येथे शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वस्त व सुरक्षित पर्याय म्हणून ही सेवा अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र, नवीन बस देण्याबाबत वारंवार आश्वासने दिली जात असली, तरी प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली दिसत नाही.

दुसरीकडे, दस्तुरी नाका ते माथेरान रेल्वे स्टेशन दरम्यान सुरू करण्यात आलेली ई-रिक्षा सेवा पर्यटकांसाठी दिलासा देणारी ठरली आहे. मात्र, एकूण ९४ परवाना धारकांपैकी केवळ २० जणांनाच ई-रिक्षा उपलब्ध झाल्याने उर्वरित ७४ चालकांमध्ये तीव्र नाराजी आहे. सर्व परवाना धारकांना ई-रिक्षा उपलब्ध करून दिल्यास वाहतूक सुरळीत होण्यास मोठी मदत होईल, अशी मागणी होत आहे.दरम्यान, नेरळ मार्गे माथेरान हा एकमेव प्रवेशमार्ग असल्याने सुट्ट्यांच्या काळात दस्तुरी नाक्यावर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होते. अपुऱ्या पार्किंग सुविधेमुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात आणि पर्यटकांना तासनतास घाटात अडकून राहावे लागते. या समस्येवर पर्यायी मार्ग, मल्टीलेव्हल पार्किंग किंवा नियोजनबद्ध वाहतूक व्यवस्थेची गरज असूनही प्रशासनाकडून अपेक्षित पावले उचलली जात नसल्याची खंत व्यक्त होत आहे.याशिवाय, पिण्याच्या पाण्याची टंचाई, कचरा व्यवस्थापनातील त्रुटी, अपुरी आरोग्य सुविधा आणि आपत्कालीन सेवांचा अभाव या समस्या देखील गंभीर बनत आहेत. पर्यटनावर आधारित अर्थव्यवस्था असलेल्या माथेरानमध्ये या मूलभूत बाबींकडे दुर्लक्ष होणे हे चिंताजनक असल्याचे जाणकारांचे मत आहे.एकीकडे पर्यटन वाढवण्यासाठी प्रयत्न होत असताना, दुसरीकडे मूलभूत सुविधा आणि पायाभूत व्यवस्थेकडे दुर्लक्ष होत असल्याने स्थानिक नागरिक आणि पर्यटक दोघेही त्रस्त झाले आहेत. त्यामुळे या सुंदर पर्यटनस्थळाला खरंच कुणी वाली आहे का? असा संतप्त सवाल आता सर्वसामान्यांकडून उपस्थित केला जात आहे.

माथेरानच्या सर्वांगीण विकासासाठी तातडीने ठोस धोरण आखून, मिनीबस सेवा सुधारणा, सर्वसमावेशक ई-रिक्षा वाटप, पार्किंग व्यवस्थेचा विस्तार आणि मूलभूत सुविधांची उभारणी करणे ही काळाची गरज बनली आहे. अन्यथा, पर्यटन नगरीची ओळख असलेले हे ठिकाण व्यवस्थापनाच्या अभावामुळे हळूहळू समस्यांच्या गर्तेत अडकण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# गॅस एजन्सीकडून टाळाटाळ; ग्राहक संतप्त !

**अक्षराज : अर्जुन कवडे**
**दि.२१, खराडी (पुणे) :** खराडी येथील साई भारत गॅस एजन्सीकडून गॅस सिलिंडर वितरणात टाळाटाळ होत असल्याची तक्रार समोर आली आहे. अनेक ग्राहकांना वेळेवर सिलिंडर न मिळाल्यामुळे नाराजी व्यक्त होत आहे.




ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, गॅस सिलिंडरचे बुकिंग करूनही कोटा संपला आहे अशी उत्तरे एजन्सीकडून दिली जात आहेत. तसेच सध्या ऑनलाइन बुकिंगही बंद असल्याचे सांगितले जात असल्यामुळे ग्राहकांची अधिकच गैरसोय होत आहे.

प्रत्यक्ष स्थळी पाहणी केली असता, एजन्सीसमोर ग्राहकांची मोठी गर्दी झालेली दिसून येते. अनेक नागरिक लांब रांगेत उभे राहून आपल्या क्रमांकाची वाट पाहताना दिसत आहेत. काही ग्राहकांनी दीर्घकाळ प्रतीक्षा करूनही समाधानकारक सेवा मिळत नसल्याची तक्रार व्यक्त केली.

दरम्यान, चंदननगर प्रतिनिधींनी घटनास्थळी भेट देऊन रांगेत उभ्या असलेल्या ग्राहकांशी संवाद साधला. यावेळी ग्राहकांनी सांगितले की, बुकिंग कन्फर्म होऊनही बराच काळ गॅस सिलिंडर मिळत नाही. चौकशीसाठी एजन्सीकडे गेल्यावर कर्मचाऱ्यांकडून आत येऊ दिले जात नाही, अशीही तक्रार करण्यात आली.

तसेच, एजन्सीकडील दूरध्वनी क्रमांक सतत बंद ठेवले जात असल्याचा आरोप ग्राहकांनी केला आहे. त्यामुळे तक्रार नोंदवणे तसेच गॅस सिलिंडरचा म
ागोवा (ट्रॅकिंग) घेणे ग्राहकांसाठी कठीण झाले आहे. याशिवाय, एजन्सीकडे KYC करण्यासाठी कोणतीही योग्य व्यवस्था नसल्यामुळे ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. KYC प्रक्रियेअभावी अनेक ग्राहकांचे काम प्रलंबित राहिले आहे. तसेच, एजन्सीतील कर्मचाऱ्यांचे वर्तन अत्यंत उद्धट असल्याची तक्रार ग्राहकांनी केली आहे. समाधानकारक माहिती दिली जात नसल्यामुळे ग्राहकांमध्ये नाराजी वाढत आहे.

दरम्यान, स्थानिक ग्राहकांनी सांगितले की, त्यांनी फेब्रुवारी महिन्यात गॅस सिलिंडरची नोंदणी (बुकिंग) केली होती, मात्र आजपर्यंत त्यांना सिलिंडर मि
ळालेला नाही.

या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून, संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.




## मराठवाड्याचा रेल्वेप्रश्न कधी सुटणार?

मराठवाड्यातील रेल्वेप्रश्नांवर चर्चा करण्याचे ठरविले तर ती किती काळ चालेल सांगता येत नाही. आठही जिल्ह्यांत रेल्वेचा आवाज पोचण्यासाठी तब्बल सहा दशकांहून अधिकचा काळ वाट पाहावी लागली. मराठवाड्यातील नागरिकांच्या सोयीचा विचार करूनच कुठलीही नवीन वा विशेष रेल्वे सुरू करणे अपेक्षित आहे, मात्र असे प्रत्यक्षात होताना कधीच दिसत नाही. दीर्घ प्रतीक्षेनंतर थोड्याफार प्रमाणात का होईना, आठही जिल्हे रेल्वेसेवेच्या नकाशावर उमटले. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली हे जिल्हे रेल्वेने जोडले गेले, मीटरगेजचे ब्रॉडगेज करण्यासाठी दोन दशके लढावे लागले.


मागील तीन दशकांत लातूर, धाराशिव व बीड जिल्ह्यांत रेल्वे कशीबशी पोचली ; पण पुढे विस्ताराचे काय, हा प्रश्न कायम आहे. मराठवाड्यातील रेल्वेसेवेचे गणितही अजब आहे. पाच जिल्हे 'दक्षिण मध्य'शी, तर तीन जिल्हे 'मध्य रेल्वे'शी जोडले गेले आहेत. त्यामुळे केंद्रात मागण्या मांडताना नेहमीच अडचण होते. मराठवाड्यातून जाणाऱ्या आणि येणाऱ्या गाड्यांच्या थांब्यांबाबत नेहमीच प्रश्न उपस्थित होतात. किंबहुना नवीन, विशेष रेल्वे सुरू झाल्यानंतर मराठवाड्याबाहेरील मोठ्या स्थानकांवर मिळणारी जागा हा कायम चर्चेचा विषय असतो. उदाहरणादाखल विचार केला तर नांदेड ते हडपसर आणि हरंगुळ ते हडपसर या दोन गाड्यांचा विचार करू.

२६ जानेवारीपूर्वीपर्यंत या दोन्ही रेल्वेगाड्या पुण्यापर्यंत जात होत्या. पुणे स्टेशनचा विकास केला जाणार आहे. तिथे जागा नाही, असे कारण सांगून या रेल्वे हडपसरपर्यंत मर्यादित करण्यात आल्या. मराठवाड्यातील चार जिल्ह्यांमधून जाणारी नांदेड – हडपसर रेल्वे पुणे स्टेशनपर्यंत न्यावी, अशी मागणी रेल्वेप्रवासी संघटना, नागरिक तसेच लोकप्रतिनिधींनी वारंवार केली. मात्र, गाडी एकदम पुण्याच्या बाहेर थांबविली नाही, असे उत्तर अधिकाऱ्यांकडून मागणीकर्त्यांना मिळाले. एखाद्या मागणीदाखल समोरून मिळालेला असा प्रतिसाद काय मानसिकता दर्शवतो?

तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या काळात ही रेल्वे सुरू झाली. मराठवाडावासीयांसाठी ही गाडी सोयीची आहे. पुण्यापर्यंत गाडी गेली तर त्यातून अनेक अडचणी दूर होतील. पण त्याकडे कोण लक्ष देणार, असा प्रश्न आहे. लातूर, धाराशिव जिल्ह्यातील रहिवाशांसाठी पुणे कनेक्ट अधिक चांगला व्हावा, यासाठी हरंगुळ ते पुणे रेल्वेसेवा सुरू करण्यात आली. या गाडीला चांगला प्रतिसाद मिळतो. पुणे स्टेशनमधील जागेची मर्यादा आणि विकासकामांच्या कारणाने ही गाडीही हडपसरलाच थांबविण्यात येत आहे. मराठवाड्यातून पुण्यात जाण्यासाठी या दोन्ही गाड्या अत्यंत सोयीच्या आहेत. त्या गाड्या हडपसरला थांबविल्याने मराठवाड्यातील नागरिकांवर एक प्रकारे अन्यायच झाला असे म्हणावे लागेल.

मराठवाड्यातील रेल्वेप्रवाशांच्या या त्रासाचा मुद्दा धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी संसदेत उपस्थित केला. ओमराजेंसोबत मराठवाड्यातील खासदारांनीही या मुद्द्यावर एकत्र येऊन लढण्याची गरज आहे. उन्हाळी विशेष म्हणून पुणे –गोरखपूर, पुणे –दानापूर या दोन रेल्वे दहा मार्चपासून सुरू करण्यात आल्या. तूर्तास मार्च अखेरपर्यंत या रेल्वे धावतील असे म्हटले आहे. या गाड्यांसाठी पुणे स्टेशनमध्ये जागेची उपलब्धतता आहे; मात्र मराठवाड्यातील रेल्वेंसाठी नाही, असे कसे काय? नांदेड–पुणे गाडी आता हडपसरपर्यंत जाते तिथून हरंगुळला जाते आणि परत येऊन पुन्हा नांदेडला परत येते. जर ही गाडी पूर्वीप्रमाणे पुण्यापर्यंत नेली, तर तसे नेमके अडचणीचे काय यावरही रेल्वे प्रशासनाकडून सांगणे अपेक्षित आहे. नांदेड आणि हरंगुळ गाड्यांना पुण्यात पूर्वीप्रमाणे नेल्यास निश्चितच सोयीचे ठरेल. मराठवाड्यातील रेल्वेप्रश्नावर विचारणा केली, आंदोलन केले तर त्याला प्रतिसाद मिळतोच असे नाही. दक्षिण मध्य रेल्वे आणि मध्य रेल्वेत विभागलेल्या मराठवाड्याची रेल्वे दैना कधी सुटणार?

# वन आणि अर्थव्यवस्था ˉ पैशांपलीकडचा हरवलेला संवाद




मार्च २१. आंतरराष्ट्रीय वन दिन. दरवर्षी आपण हा दिवस साजरा करतो. संदेश दिले जातात, उपक्रम राबवले जातात, आणि काही काळासाठी का होईना, आपण वनांविषयी बोलतो. पण एक प्रश्न मनात अलगद उमटतो ˉ आपण खरंच वनांशी जोडलेलो आहोत का, की फक्त त्यांच्याविषयी बोलण्यापुरतेच मर्यादित आहोत?

यंदाचा विषय आहे वन आणि अर्थव्यवस्था. पहिल्या दृष्टीक्षेपात हा विषय आपल्याला बाजारपेठ, पैसा, उद्योग आणि विकासाशी जोडलेला वाटतो. पण जरा थांबून, शांतपणे विचार केला तर लक्षात येतं की कदाचित आपण अर्थव्यवस्था या शब्दाचा अर्थच खूप मर्यादित करून टाकला आहे.

आपल्यासाठी अर्थव्यवस्था म्हणजे व्यवहार, नफा, वाढ. पण वनांमध्ये अर्थव्यवस्था वेगळीच असते. तिथे झाडं ऑक्सिजन देतात ˉ कोणताही व्यवहार नाही. नद्या वाहतात ˉ कोणतंही बिल नाही. पक्षी, प्राणी, कीटक, माती ˉ सगळे एकमेकांच्या अस्तित्वाला आधार देतात. ही एक अदृश्य अर्थव्यवस्था आहे, जी नात्यांवर चालते, विश्वासावर टिकते आणि संतुलनावर फुलते.

एक काळ असा होता, जेव्हा माणूस या व्यवस्थेचा एक भाग होता. तो निसर्गात राहायचा, पण त्याच्यावर राज्य करत नव्हता. त्याला माहित होतं की वापर आणि जतन यामध्ये संतुलन ठेवणं आवश्यक आहे. पण हळूहळू काहीतरी बदललं. आपण या साखळीतील भागीदार राहिलो नाही, आपण स्वतःला त्याचा मालक समजू लागलो.

वनं म्हणजे संपत्ती झाली. झाडं म्हणजे लाकूड. नद्या म्हणजे संसाधन. आणि इथूनच कदाचित आपल्या चुकांची सुरुवात झाली. विकासाच्या नावाखाली आपण नात्यांपेक्षा व्यवहारांना महत्त्व दिलं. आपण घेणं शिकलो, पण देणं विसरलो. प्रगती झाली, पण त्या प्रगतीत संबंध हरवले.

वनं मात्र आजही शांतपणे आपल्याला शिकवत आहेत. ती सांगतात की या सृष्टीत काहीही एकटं टिकत नाही. प्रत्येक गोष्ट दुसऱ्यावर अवलंबून आहे. झाड मातीवर, माती पाण्यावर, पाणी हवामानावर, आणि शेवटी माणूस या सगळ्यावर. म्हणजेच आपण निसर्गावर अवलंबून आहोत, निसर्ग आपल्यावर नाही. हा साधा विचार आपण कुठेतरी मागे सोडून आलो.

आज जर खरंच काही बदल घडवायचा असेल, तर तो केवळ तंत्रज्ञानातून किंवा धोरणांमधून होणार नाही. तो होईल आपल्या विचारांमधून, आपल्या मनातून. संवेदनशीलता ही त्याची पहिली पायरी आहे ˉ निसर्गाला वस्तू म्हणून नव्हे, तर जिवंत अस्तित्व म्हणून पाहणं. त्यानंतर जाणीव ˉ आपल्या कृतींचा परिणाम समजून घेणं. पण फक्त जाणीव पुरेशी नाही, त्यानंतर करुणा येणं आवश्यक आहे. कारण करुणा आपल्याला कृतीकडे नेत असते. आणि त्यातूनच जबाबदारी आणि शेवटी सुसंवाद निर्माण होतो.

एकदा एका वृद्ध शेतकऱ्याने सहज बोलताना सांगितलं होतं, आम्ही झाडं लावतो कारण आम्हाला सावली हवी म्हणून नाही, तर पुढच्या पिढीला सावली मिळावी म्हणून. हा विचार किती साधा, पण किती गहन आहे! आजच्या अर्थव्यवस्थेत हा विचार किती दिसतो? आपण गुंतवणूक करतो, पण नफ्यासाठी. आपण योजना करतो, पण तात्पुरत्या फायद्यासाठी. दीर्घकालीन नात्यांची गुंतवणूक आपण विसरलो आहोत.

आज आपण विकासाच्या नावाखाली बरेच काही मिळवलं आहे ˉ मोठी शहरं, वेगवान रस्ते, प्रगत तंत्रज्ञान. पण या सगळ्यात आपण काय गमावलं? स्वच्छ हवा, शांत नदी, संतुलित हवामान आणि कदाचित सर्वात महत्त्वाचं म्हणजे निसर्गाशी असलेलं आपलं नातं. विकास जर निसर्गाच्या विरोधात उभा राहत असेल, तर तो खरोखर विकास आहे का? की तो एक विसंवाद आहे? आज आपल्याला नवीन तंत्रज्ञानापेक्षा नवीन विचारसरणीची गरज आहे. अशी अर्थव्यवस्था जी नफ्यासोबत निसर्गाचं जतनही करते. जिथे प्रत्येक निर्णय घेताना आपण स्वतःला विचारतो ˉ याचा परिणाम पुढच्या पिढीवर काय होईल?

हा प्रश्न फक्त सरकारचा किंवा संस्थांचा नाही. हा प्रश्न प्रत्येकाचा आहे. आपल्या घरातून, आपल्या छोट्या कृतीतून आपण बदलाची सुरुवात करू शकतो. संसाधनांचा वापर जपून, निसर्गाशी जोडलेले निर्णय घेऊन, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे आपल्या पुढच्या पिढीला निसर्गाशी जोडून.

आज मी कोणतंही अंतिम उत्तर देत नाही. फक्त एक प्रश्न विचारतो ˉ आपण कुठे चुकलो? आणि आता पुढे योग्य दिशा कोणती असू शकते? कदाचित या प्रश्नांची उत्तरं वेगवेगळी असतील, पण त्या उत्तरांमधूनच एक सामूहिक दिशा तयार होऊ शकते.

चूक झाली आहे, पण उशीर झालेला नाही. जर आपण पुन्हा संवेदनशीलतेने सुरुवात केली, जाणीवेच्या पुढे जाऊन करुणेला जागा दिली, तर आपण पुन्हा सुसंवादाकडे जाऊ शकतो. वनं अजूनही तिथेच आहेत ˉ शांतपणे, संयमाने, आपली वाट पाहत.

प्रश्न इतकाच आहे आपण त्यांचं ऐकायला तयार आहोत का?

**– विजयकुमार कट्टी**
**७९७७५१३८२२**

# 'समाज' पुढारलेला कि मागासलेला?

पौराणिक इतिहासाचा वारसा, सांस्कृतिक नगरी, धार्मिकता ही नाशिक भुमीची ओळख. महाराष्ट्रात केवळ नाशिक–त्र्यंबकेश्वर येथेच कुंभमेळा होतो आता तो होऊ घातला आहे, प्रभु रामचंद्रांची पावन भुमी तपोवन नाशिक मधेच आहे. अशा या नाशिक मधे अशोक खरात नामक एका भोंदूबाबांच्या ' लीलां' चा खरा प्रतापी चेहरा आणि खोटा मुखवटा समाजासमोर आला. जणु काही महाराष्ट्रात मिनी' एपस्टिन 'फाईलच खुली झाली. स्वतः ला मर्चंट नेव्ही कॅप्टन आणि अंकशास्त्र तज्ञ म्हणविणाऱ्या या भोंदूबाबांचे खरे ऊद्योग काय होते आणि त्या निमित्ताने महिलांचे लैंगिक शोषण कसे केले जायचे हे एका महिलेने हिंमत करुन तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्याने समाजासमोर आले आहे. त्याच्या काही व्हिडिओ क्लिप्स तर अत्यंत संतापजनक आहे. विशेष म्हणजे या भोंदूबाबांच्या नादाला महाराष्ट्रातील काही वजनदार राजकिय नेते लागले असल्याचे ऊघड झाले आहे.

जवळपास ५८ अश्लील व्हिडीओ क्लिप्स जप्त करण्यात आल्या आहेत. यात अतिशय चिंतेची बाब म्हणजे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा या देखील या बाबाच्या नादाला लागल्याचे आणि त्याचे बाबांशी किती घनिष्ठ संबंध आहेत हे ऊघड करणारे अनेक फोटो समाज माध्यमातून प्रसिद्ध होत आहे. या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे राज्यातील अनेक बडे राजकारणी हे या भोंदूबाबांच्या नादाला लागल्याचे ऊघड झाले, अजुनही अनेक नावे ऊघड होतील. यातील चीड आणणारी आणि चिंतेची बाब म्हणजे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा या देखील या भोंदूबाबांच्या अतिशय जवळच्या असल्याचे समोर येत आहे याबाबत काही फोटो समाज माध्यमातून येत आहे ते त्या बाबाच्या मंदिर ट्रस्ट मधे सदस्या आहेत, त्याचे पाय धुतांना, ऐकमेकांना पेढा भरवतांना त्या दिसतात या वरूनच त्यांचे आणि भोंदूबाबांचे संबध कसे असतील याची कल्पना येऊ शकते. असे असले तरी वैयक्तिक आयुष्यात भोंदूबाबां काय प्रताप करत होता याची माहिती मला नाही, मात्र त्यांचे हे म्हणणे कोणाला तरी पटले का?.

ज्या राजकारण्यांनी, समाजातील प्रतिष्ठितांनी, ऊच्च शिक्षितांनी समाजाचे नेतृत्व करत समाजाला दिशा देणे अपेक्षित आहे, प्रबोधन करणे अपेक्षित आहे, तेच अशा अंधश्रद्धेला, भोंदूगिरीला बळी पडत असतील दोष कोणाला द्यायचा. याच राजकारण्यांनी विधिमंडळात अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची दखल घेऊन महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अघोरी व दुष्कर्मी प्रथा आणि काळी जादू अधिनियम २०१३ (जादूटोणा विरोधी कायदा) २०१३ मधे संमत केला आणि तो राज्यात लागू आहे. अंधश्रद्धेतून होणारे मानवी शोषण रोखण्यासाठी आणि नरबळी व काळ्या जादूला प्रतिबंध करण्यासाठी हा कडक फौजदारी कायदा तयार करण्यात आला.दुर्दैवानेजादूटोणाविरोधी कायदा राज्यात आणला तेच अशा भोंदूबाबांच्या नादी लागतात हे पुरोगामी महाराष्ट्राला शोभनीय नाही. बुवा तिथे बाया आणि त्यांच्या लीला यांची चर्चा नेहमीच होत आली आहे. आपल्या अडचणींमधुन कोणीतरी आपल्याला वाचवेल या भोळ्या भाबड्या आशेने अनेकजण अशांच्या नादी लागून आपले आयुष्य ऊद्वस्त करुन घेतात. महिलां विरोधातील अत्याचार पिडितांना न्याय मिळावा यासाठी केंद्रीय तसेच राज्य पातळीवर महिला आयोगाची स्थापना करण्यात आली त्या आयोगाला तसे अधिकार देण्यात आले, अनेकदा या आयोगाकडुन महिलांना न्याय मिळतो देखील मात्र एखाद्या प्रकरणात हितसंबंध गुंतले असले तर मात्र महिला आयोग पिडिते ऐवजी गुन्हेगारांना वाचविण्याचाच प्रयत्न करते हे देखील अनेकदा अधोरेखित झाले आहे. या प्रकरणी देखील पिडितांना न्याय मिळेल आणि भोंदूबाबांला शिक्षा होईल का याबाबत जनतेला शंका आहे.

याला कारण म्हणजे महिला आयोगाच्या अध्यक्षा आणि खरात यांच्यातील जवळकीचे संबध. एखादे प्रकरण ऊघड झाले कि कोणालाही सोडणार नाही, दोषींना शिक्षा होणारच, कायद्यासमोर सर्व समान असे सांगितले जाते ते केवळ तोंडदेखलेपणाने, मात्र ज्यांना वाचवायचे असते त्यांना ऐन केन प्रकाराने वाचविले जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत कठोर कारवाई चे आदेश दिले आहेत त्यांच्याकडुन जनतेला अपेक्षा आहे. मात्र याबाबत महिला आयोगाकडुन फार अपेक्षा ठेवता येत नाही महिला आयोग खरोखरच पिडितांना न्याय मिळवून देईल का?. एखाद्या प्रकरणात हितसंबंध असतील तर त्या प्रकरणांचे काय होते हे ये पब्लिक है ये सब जानती है. केवळ हा एकच प्रकार नाही तर असे बुवाबाजीचे प्रकार सातत्याने घडत आहेत. भविष्याचा वेध घेतांना अशा भोंदूबाबांच्या नादी लागून आजवर अनेकांनी आपले भविष्य ऊद्वस्त करुन घेतले आहे.

ऐकिकडे फुले, शाहू, आंबेडकर, महात्मा फुले यांच्या सारख्या समाज सुधारकांचा वारसा सांगत पुरोगामी महाराष्ट्राचा टेंभा मिरवायचा तर दुसरीकडे बुवा महाराजांच्या नादी लागून अंधश्रद्धा जोपासायची याची सांगड कशी घालायची? कोणाची कोणावर श्रद्धा असणे, विश्वास असणे हा प्रत्येकाचा वैयक्तीक प्रश्न आहे, मात्र सार्वजनिक जिवनात वावरतांना श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामधील पुसटशी रेषा ओळखता आली पाहिजे.आज आपण एकविसाव्या शतकात आहोत याचे भान सगळ्यांनी बाळगण्याची गरज आहे आणि इतकी सज्ञानता असेल तर अशा भोंदूबाबांच्या लीलांना नक्कीच आळा बसेल.. राजकिय, शासन–प्रशासन यांच्या तील झारीतील शुक्राचार्य यांचा आशीर्वाद असल्याशिवाय असे प्रकार बिनदिक्कतपणे होऊ शकत नाही. याही बाबतीत सगळेच हमाम मे..... असण्याची शक्यता आहे. नाईलाजाने चाकणकर ताईंनी राजीनामा दिला ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब. या निमित्ताने समाज पुढारलेला आहे कि मागासलेलाच राहिला आहे असा प्रश्न पडतो.







**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**

## पालक परिक्षा

झाली एकदा परिक्षा
मुले झाली रे मोकळी
मुलां पेक्षा पालकांना
सुखे फुटली उकळी

आता पालक परिक्षा
सांभाळे फुलपाकळी
बांधू नका अपेक्षांची
रे भोवताली साखळी

जाणले आहे कधी रे
गोड पाणी ते नारळी
दिसते जरी नयनरम्य
जपावी लागते हरळी

एका साच्याची कधी
नसतात मुले सगळी
प्रत्येकांचे छंद निराळे
असते आवड वेगळी

कुठे उगवते आमराई
बोगनवेली न् बाभळी
कुठे खडक दगडधोंडे
माती उपजावू आगळी

आपुलकी स्पर्शामधून
घ्यावे विश्वासे जवळी
सावराआवरा गा जरा
वये असतात कोवळी

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ऑल इंडिया विद्यापीठ तायक्कॉंदो स्पर्धेत आर्यन येवले याला कास्यपदक



**संदिप येवले**

**मुंबई :** ऑल इंडिया विद्यापीठ तायक्कॉंदो स्पर्धा १६ ते २० मार्च २०२६ या कालावधीत जालंधर (पंजाब) येथे आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेसाठी संपूर्ण भारतातून २५० हून अधिक विद्यापीठ सहभागी झाले होते.

रत्नागिरी येथे ३ ते ५ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या आंतर विद्यापीठ तायक्कॉंदो स्पर्धेत खालसा कॉलेज, माटुंगा या कॉलेज मधून या स्पर्धेसाठी आर्यन सहभागी झाला होता. ६८ किलो खाली वजन गटात मुंबई विद्यापीठ संघात ऑल इंडिया विद्यापीठ तायक्कॉंदो स्पर्धेसाठी आर्यन येवले याची निवड झाली होती. आर्यन येवले याने ६८ किलो खालील वजनी गटात कास्यपदक पटकावले आहे. आंतरराष्ट्रीय तायकवॉंडो प्रशिक्षक राजेश मुरव, संदिप येवले यांचे आर्यनला मार्गदर्शन मिळत आहे.

तायकवॉंडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई संघटनेचे महासचिव-मिलिंद पठारे, सचिव-सुभाष पाटील, अध्यक्ष-अविनाश बारगजे, खजिनदार-व्यंकटेश कररा यांनी अभिनंदन केले आहे.

## प्लॅटफॉर्म विस्तारासाठी आज मध्य रेल्वेचा १० तासांचा मेगाब्लॉक




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२१, ठाणे :** मध्य रेल्वेच्या उपनगरीय स्थानकांवर १५ डब्यांच्या लोकल थांबणे सोयीचे व्हावे या दृष्टीने ठाणे आणि डोंबिवली स्थानकांवरील प्लॅटफॉर्मच्या विस्ताराचे काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी काल शनिवार रात्री १२ वाजल्यापासून ते आज रविवारी सकाळी १० वाजेपर्यंत विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. यावेळी अनेक लोकल गाड्या रद्द असणार असून तर काही लोकल धीम्या मार्गाऐवजी जलद मार्गावर वळवण्यात येणार आहेत.

ब्लॉक कालावधीत कल्याणवरून सुटणाऱ्या धीम्या लोकल जलद मार्गावर वळवण्यात येतील. त्यामुळे ठाकुर्ली आणि कोपर येथे थांबा नसणार आहे. पुढे दिवा-ठाणे दरम्यान पुन्हा धीम्या मार्गावर लोकल आणल्या जातील. ठाणे मुलुंडदरम्यानही काही गाड्या जलद मार्गावर वळवण्यात येणार आहेत.

दरम्यान मेगा ब्लॉक कालावधीत डोंबिवली येथे सुरू/समाप्त होणाऱ्या सर्व गाड्या रद्द, ब्लॉक कालावधीत मुलुंड-ठाणे आणि दिवा-कल्याण दरम्यान अप/डाउन सर्व उपनगरीय सेवा रद्द असणार आहेत. शनिवारी रात्री उशिरा सुरू होणाऱ्या गाड्यांपासून ते रविवारी म्हणजे आज सकाळी ९ वाजेपर्यंतच्या काही सेवांमध्ये बदल करण्यात आले आहेत. या कालावधीत कल्याणहून सुटणाऱ्या अप धीम्या गाड्यांना अप जलद मार्गावर वळवण्यात येणार असून, त्या पुढे ठाणे-मुलुंडदरम्यान पुन्हा धीम्या मार्गावर आणल्या जातील, अशी माहिती देण्यात आली आहे.

मध्य रेल्वेच्या ठाणे आणि वाशी/नेरुळ स्थानकांदरम्यान 'ट्रान्स हार्बर मार्गावर आज रविवारी मेगा ब्लॉक असणार आहे. हा मेगा ब्लॉक अप आणि डाऊन मार्गावर सकाळी ११:१० ते दुपारी ४:१० वाजेपर्यंत असेल. या कालावधीत वाशी/नेरुळ आणि ठाणे स्थानकांदरम्यान 'अप' आणि 'डाऊन' ट्रान्स-हार्बर मार्गावरील सेवा रद्द राहतील. तर दुपारी ४:१० नंतर सेवा सुरळीत सुरू राहणार आहे, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

## डहाणू फेस्टिव्हलच्या माध्यमातून पर्यटन विकासाला गती मिळणार : परिवहन मंत्री



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२०, डहाणू (पालघर) :** डहाणू हा निसर्गसौंदर्याने नटलेला परिसर असून येथे पर्यटनाच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. डहाणू फेस्टिव्हलच्या माध्यमातून पर्यटन विकासाला गती मिळणार असल्याचा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. निसर्गरम्य वातावरणात बहरलेल्या डहाणू फेस्टिव्हलचे उद्घाटन राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते संपन्न झाले

यावेळी आमदार रविंद्र फाटक , आमदार राजेंद्र गावीत, आमदार विनोद निकोले, आमदार विलास तरे, जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, डहाणू नगरपालिकेचे नगराध्यक्ष राजेंद्र माच्छी, पालघर नगरपालिकेचे नगराध्यक्ष उत्तम घरत सहा जिल्हाधिकारी तथा डहाणू प्रकल्प अधिकारी विशाल खत्री, माजी आमदार सर्वश्री सुनिल भुसारा,अमित घोडा, श्रीनिवास वनगा मनिषा निमकर राज्य अनुसूचित जमाती आयोगाच्या सदस्या वैदेही वाढाण, डहाणू नगर परिषदेचे मुख्य अधिकारी अक्षय गुडदे निलेश सांबरे, कुंदन संखे, आनंदभाई ठाकूर, जगदीश धोडी, मिलिंद पाटील, सुनिल कोळी, पल्लवी सस्ते, भूपेन बारी, दिपेश बारी तसेच नागरिक उपस्थित होते.

डहाणूसाठी प्रस्तावित १० बसेसऐवजी आता २५ बसेस देण्यात येणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. यामुळे प्रवाशांना अधिक सोयीसुविधा उपलब्ध होणार असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बळकटी मिळणार आहे

तसेच, येत्या काही दिवसात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'राजमाता जिजाऊ' या नव्या बसचे अनावरण होणार असून, पुढील सहा महिन्यांत ३,००० बसेस राज्याच्या सेवेत दाखल होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या बसेसपैकी काही बसेस डहाणूसाठी देण्यात येणार असल्याचेही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

पर्यटन विकासाच्या दृष्टीनेही सकारात्मक संकेत देत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, डहाणूसाठी पर्यटन विभागामार्फत चार कोटी रुपयांच्या निधीचा प्रस्ताव विचाराधीन असून, याशिवाय आणखी पर्यटन प्रकल्प राबवण्यासाठी शासन पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. डहाणू फेस्टिव्हलच्या आयोजनाचे कौतुक करत त्यांनी आयोजकांचे अभिनंदन केले. ठाणे आणि मीरा-भाईंदर येथे आम्ही अनेक वर्षांपासून फेस्टिव्हल आयोजित करतो, मात्र डहाणूचा हा उपक्रम अधिक प्रेरणादायी आहे, असे सांगत त्यांनी भविष्यात महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# पुनर्वसनाशिवाय चंद्रपूरातील एकाही अतिक्रमणधारक नागरिकावर अन्याय होऊ देणार नाही

### * आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या रेल्वे प्रशासनाला ठाम सूचना




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** चंद्रपूर येथील रेल्वेलाईनलगत राहणाऱ्या अतिक्रमणधारक नागरिकांचे पुनर्वसन सुनिश्चित केल्याशिवाय कोणालाही बेघर होऊ दिले जाणार नाही, अशा ठाम सूचना राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या. चंद्रपूर जिल्हाधिकारी येथील कार्यालयातील २० कलमी सभागृहात त्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत त्यांनी रेल्वे प्रशासनाच्या सुरू असलेल्या कारवाईवर तीव्र नाराजी व्यक्त करत, पुनर्वसनाची ठोस व्यवस्था होईपर्यंत अतिक्रमण हटविण्याची कारवाई तात्काळ स्थगित ठेवण्याची मागणी केली.

चंद्रपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील २० कलमी सभागृहात रेल्वे अतिक्रमण या बैठकीला अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. व्यवहारे, रेल्वेचे अधिकारी तसेच चंद्रपूर येथील अतिक्रमणधारक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मध्य रेल्वे, नागपूर मंडळाकडून चंद्रपूर येथील सावरकर नगर, जल नगर, उडिया बस्ती तसेच महाकाली कॉलरी परिसरातील घरांवर अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित रेल्वे प्रशासनासोबत बैठकीत आ. मुनगंटीवार म्हणाले, 'सर्वांना घर' ही संकल्पना केंद्र सरकारकडून साकार करत असताना, दुसरीकडे रेल्वे प्रशासनाच्या कारवाईमुळे नागरिकांना बेघर होण्याची वेळ येणे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे संबंधित नागरिकांना पर्यायी व सक्षम पुनर्वसनाची व्यवस्था केल्याशिवाय कोणतीही कारवाई होऊ नये, अशा स्पष्ट सूचना आ. मुनगंटीवार यांनी दिल्या.

या विषयावर पुढील निर्णायक पाऊल म्हणून येत्या मंगळवारी मुंबई येथे रेल्वेचे जीएम यांच्यासोबत, तसेच झूमद्वारे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात येणार आहे. या बैठकीत पुनर्वसनाबाबत ठोस निर्णय घेतला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. चंद्रपूर येथील अतिक्रमणधारक नागरिकांच्या प्रश्नावर आ. सुधीर मुनगंटीवार यांनी घेतलेली भूमिका ही केवळ प्रशासकीय न राहता मानवी संवेदनशीलतेची जाणीव करून देणारी आहे. पुनर्वसनाशिवाय कोणालाही बेघर होऊ देणार नाही, हा त्यांचा स्पष्ट आणि ठाम दृष्टिकोन चंद्रपूरकर नागरिकांना दिलासा देणारा ठरत असून, लोकप्रतिनिधी म्हणून सामान्यांच्या हक्कांसाठी उभे राहण्याची त्यांची बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित होते.

# पुणे जिल्ह्यातील अपहरण प्रकरणातील १७ वर्षीय मुलीचा राहुरी पोलिसांकडून शोध

### ऑपरेशन मुस्कान अंतर्गत १०७ मुलींचा लावला मागोवा




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२१, राहुरी :** पुणे जिल्ह्यातील यवत तालुक्यातून बेपत्ता झालेल्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा शोध राहुरी पोलिसांनी यशस्वीरित्या लावला असून तिला सुरक्षितपणे ताब्यात घेऊन संबंधित पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या कारवाईमुळे पालकांना मोठा दिलासा मिळाला असून राहुरी पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे.

यवत तालुक्यातील एका गावातील ही अल्पवयीन मुलगी दि.१४ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास घरातून कोणालाही न सांगता निघून गेली होती. ती परत न आल्याने चिंताग्रस्त पालकांनी यवत पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा (क्र. १६२/२०२५, बीएनएस कलम १३७(२)) दाखल केला होता. पोलिसांकडून तिचा शोध सुरू असताना ही मुलगी राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याची गोपनीय माहिती पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद ढाकणे यांना मिळाली.

ही माहिती त्यांनी तात्काळ वरिष्ठांकडे दिल्यानंतर राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय आर. ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने कारवाई करत संबंधित मुलीचा शोध घेतला. त्यानंतर यवत पोलीस ठाण्याशी समन्वय साधून तपासी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दि. २१ मार्च २०२६ रोजी मुलीला त्यांच्या ताब्यात देण्यात आले.

दरम्यान, 'ऑपरेशन मुस्कान' या मोहिमेअंतर्गत राहुरी पोलिसांनी आतापर्यंत तब्बल १०७ हरवलेल्या मुलींचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले आहे. या मोहिमेमुळे अनेक कुटुंबांना आपल्या मुलांशी पुन्हा एकत्र येण्याचा आनंद मिळाला आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली पो. कॉ. प्रमोद ढाकणे, सचिन ताजने व अंकुश भोसले यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.

# दरोडी येथे आजपासून पीर शेख बहाऊद्दीन दर्गाचा ऊरुस

**अक्षराज : राजकूमार इकडे**

**दि.२२, सुपा (अहिल्यानगर) :** हिंदू - मुस्लिम ऐक्याचे प्रतिक, श्रद्धास्थान व जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या दरोडी येथील पीर शेख बहाऊद्दीन चिश्ती रहे . अलैह दर्गाह चा ऊरुस आज रविवार दि.२२ ते बुधवार दि.२५ असे ४ दिवस चालणार असून यासाठी राज्य व परराज्य भरातून भाविक मोठ्या सहभागी होणार असल्याची माहिती ट्रस्टचे विश्वस्त अन्वर भाई मुजावर यांनी दिली आहे.

पारनेर - अळकुटी रस्त्यावरील रांधे गावापासून ३ किलोमीटर अंतरावर डोंगराच्या कुशीत ३ हजार लोकवस्तीचे असलेले दरोडी गावाच्या पश्चिम बाजूच्या पायथ्याशी असलेली शेख भाऊ बहाउद्दिन चिस्ती रहे यांची दर्गा आहे. ही पौराणिक दर्गा वास्तू ८३१ वर्षांपूर्वीचे असून वर्षातून पीर साहेबांचे दोनदा उरुस उत्सवाचा कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने संपन्न केला जातो. पहिला उरूस पीर साहेबांनी समाधी घेतलेला दिवस म्हणजे उर्दू दशाबान ला असतो, हा ऊरुस फक्त एक दिवसाचा असतो, तर दुसरा उरूस म्हणजे हिंदू पंचांगाप्रमाणे चैत्र पंचमीला असतो हा उरूस ४ दिवसांचा असतो, रविवार दि.२२ ला संदल, सोमवार दि.२३ ला चिराग, मंगळवार दि.२४ ला मोठी यात्रा म्हणजे कंदोरी, या दिवशी सर्वात मोठी यात्रा असते, तर बुधवार दि.२५ ला जीयारत, पानफुल असा भरगच्च यात्रोत्सवा ने कार्यक्रम संपन्न होणार आहे. कंदुरी चा मान लोणी मावळा येथील ग्रामस्थांचा असतो, संदलचा मान दरोडी येथील पावडे कुटुंबाचा असतो, तर दिवा लावण्याचा मान शेटे कुटुंबांचा असतो. तर भर यात्रेच्या दिवशी चादर चढवण्याचा मान पारनेर पोलिसांना असतो.

या संपूर्ण दर्गा परिसराची देखभाल पीर शेख बहाउद्दीन चिस्ती रहे. यांचे वंशज मुजावर लोक करतात. त्यांनी ट्रस्टची स्थापना केली असून त्यांतर्गत संपूर्ण नियोजन केले जाते. दरोडी येथील सर्व ग्रामस्थ आपापल्या परीने ट्रस्टला सहकार्य करून यात्रेची शोभा वाढवतात.

या ऊरूसाच्या कार्यक्रमाला सर्व धर्मीय भाविक राज्यातील पुणे, मुंबई, नाशिक, संभाजीनगर, अहिल्यानगर, सोलापूर, तर परराज्यातील हैदराबाद, गुजरात, राजस्थान




दिल्ली व इतर ठिकाणहून मोठ्या संख्येने हजेरी लावतात. तर जिल्ह्यातील सर्वपक्षीय राजकीय नेते ही दर्शनासाठी येतात. यात्रा काळात साधारणतः २ ते ३ लाखांपेक्षा जास्त भाविक दर्शन घेण्यासाठी दरोडी येथे येतात. यात्रा काळात काही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून पारनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष खेडेकर यांच्या नेतृत्वाखालील सर्व पोलीसां चा मोठा बंदोबस्त असतो. आलेल्या भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, म्हणून वैद्यकीय औषधोपचारासाठी अळकुटी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी औषधोपचारांची व्यवस्था करतात. दरोडी येथे भाविकांना येणे जाण्यासाठी परिवहन महामंडळाकडून जादा एसटी बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. तर सध्या सुरू असलेल्या उन्हाळ्यातील उन्हाच्या झळा मोठ्या प्रमाणावर बसत असून पाण्याची टंचाई ही जाणवत असल्याने भाविकांनी पाणी जपून व योग्य पद्धतीने वापरावे. आलेल्या भाविकांनी दर्गा परिसरात स्वच्छतेची दक्षता घ्यावी. भाविकांना पाण्याचे पाणी पुरवण्यासाठी सर्व पक्षांचे राजकीय मंडळी, दरोडीच्या सरपंच जयश्री चौगुले, माजी सरपंच अनिलराव पावडे, खरेदी विक्री संघाचे संचालक संग्राम पावडे, तंटा मुक्ती समिती चे अध्यक्ष नानाभाऊ चौगुले, ग्राम पंचायत व सेवा सहकारी संस्थेचे पदाधिकारी व ग्रामस्थ यांच्या बरोबरच, शेरी कासारेच्या सरपंच स्वाती मुळे, रांधेचे सरपंच संतोष काटे व इतरांचे विशेष सहकार्य करत असल्याची माहिती ही विश्वस्त अन्वरभाई मुजावर यांनी दिली.

# महाबळेश्वर येथे रमजान ईद उत्साहात साजरी

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२१, महाबळेश्वर :** महाबळेश्वर येथे मुस्लीम बांधवांकडून नमाज पठण आणि एकमेकांना शुभेच्छा देत रमजान ईद उत्साहात साजरा करण्यात आली.

पवित्र रमजान महिन्याची सांगता करणारा सण ईद-उल-फितर' (रमजान ईद) हा सण महाबळेश्वर येथे मोठ्या उत्साहात आणि शांततेत साजरा करण्यात आला. सकाळी जामा मस्जिद, मिनारा मस्जिद आणि रांजणवाडी येथे ईदगाह मैदानावर तसेच नाकिंदा, मालुसर, महारोळा, माचुतर, भेकवली या



ग्रामिण भागातील मस्जिद मध्ये मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज अदा करून देशात शांती व समृद्धीसाठी प्रार्थना केली तसेच नवीन वस्त्र परिधान करून, एकमेकांना' (ईद मुबारक)शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे मित्र परिवारा सह घराघरात विशेषतः शीर खुरमा (शेवया) चा अस्वाद घेतला.

ईदच्या दिवशी 'फित्रा' (दान) देण्याची परंपरा पाळण्यात आली. ज्यामुळे गरीबही या सणात सहभागी होऊ शकतील या करिता रमजानच्या पवित्र महिन्यात सदका, जकात फित्रा दिला जातो या माध्यमातून गरजू, गरिब, विधवा, अनाथ यांना मदत केली जाते.

भाईचारा: मुस्लिम बांधवांनी स्नेह आणि भाईचारा वाढवण्यासाठी एकमेकांना व मित्र परिवारास ईदच्या शुभेच्छा दिल्या. महाबळेश्वर शहर व आसपासच्या परिसरास आर्कषक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. शांती, प्रेम व एकात्मतेचा संदेश देणारा रमजान ईद सण उत्साहपूर्ण वातावरणात व शांततेत पार पडला.

# कुक्कुटपालन व्यावसायिकांना अध्यादेशानुसार कृषी समकक्ष दर्जाच्या सुविधा द्या - खामकर

## अन्यथा राज्यव्यापी आंदोलन छेडणार

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२१, पेण (रायगड) :** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार कुक्कुटपालन दुग्ध व्यवसाय मत्स्य पालन या व्यावसायिक शेतकऱ्यांना कृषी समकक्ष दर्जा व कृषी समतुल्य सर्व सुविधा देण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत व विधीमंडळ सभागृहात पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी जाहीर करुन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले सभागृहात अभिनंदन करुन असा निर्णय घेणारे म हाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.मात्र याकामी शासनाने काढलेल्या अध्यादेशांचे पालन अंमलबजावणी पशुसंवर्धन आयुक्त पुणे व ग्रामविकास सचिव यांना या अध्यादेशाची माहिती असून देखील कृषी दर्जाच्या सुविधा न दिल्याने कुक्कुटपालन व्यवसायिकामधे या बाबत असंतोषाची तीव्र भावना उमटली आहे.

माननीय मंत्री महोदयानी काढलेले अध्यादेश प्रशासकीय पातळीवर सर्व विभागांना माहिती असताना देखील याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यामागे कोणाचा दबाव आहे.जर मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या शासकीय निर्णय पाळले जात नसल्यास या विरोधात कुक्कुटपालन शेतकरी राज्यव्यापी आंदोलन छेडणार असा सूचक इशारा महाराष्ट्र राज्य पोल्ट्री योद्धा संघटनेचे अध्यक्ष अनिल अनिल खामकर यांनी या संदर्भात पेण येथील पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले आहे. राज्यामध्ये कुक्कुटपालन व्यवसायास चांगली चालना मि ळण्याच्या दृष्टीने तसेच, हा व्यवसाय दुर्बल घटकांतील जास्तीत जास्त लोकांनी स्वीकारावा म्हणून कुक्कुट पालन व्यवसायास विविध सोयी सवलती देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. याबाबतचे आदेशही पारीत झाले आहेत असे असताना पशुसंवर्धन आयुक्त कार्यालयात गेली २ वर्षे आंदोलने बैठकांचा सिलसिला करुन देखील संबंधीत आयुक्त व्यावसायिक शेतकरी बांधवाना सोयीसुविधा देण्याबाबत सतत दुर्लक्षीतपणा करीत असल्याचा आरोप अनिल खामकर या प्रसार माध्यमांसमोर खुलासा केला. याशिवाय ग्रामविकास मंत्रालयाचे सचीवांनी विधान परिषदेच्या २०२३ नागपुर हिवाळी अधिवेशनात १९ डिसेंबर रोजी सदस्य सत्यजित तांबे यांनी राज्यातील कुक्कुटपालन व इतर शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांकडून अनेक ठिकाणी ग्रामपंचायतीद्वारे वेगवेगळ्या पध्दतीने कराची आकारणी केली जात आहे. त्यामुळे कुक्कुटपालन व्यावयायिकांकडून वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळा कर आकारला जात आहे असा मुद्दा उपस्थित केला होता.

ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब शासन अधिसुचना, क्र. व्हीपीएम २०१५/प्र.क्र.१४०/परा-४(२२), दिनांक ३१/१२/२०१५ रोजीच्या शासन अधिसूचनेमधील स्पष्टीकरणामधील मुद्दा क्र. (आठ) मध्ये जनावरांचे गोठे, कुक्कुटपालन व तशाच प्रकाराशी निगडीत इमारती यांकरिता इमारतींच्या प्रकारानुसार निवासी



वापराप्रमाणे कर आकारणी करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सदर शासन अधिसूचना दि.३१/१२/२०१५ मधील तरतुदींनुसार ग्रामपंचायतींनी कर आकारणी करावी असे आपल्या अखत्यारितील सर्व ग्रामपंचायतींना सूचित करावे, असे उप सचिवांनी काढलेला आदेश सद्यस्थितीत ग्राम विकास सचिवांनी कायम लागू केल्याने कृषी समकक्ष दर्जा व मिळणा-या सोयी सुविधा मिळणार नाहीत.

याबाबत मंत्रीमहोदय गिरीश महाजन आणि मंत्रीम होदय राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकऱ्यांना भक्कम पाठबळ दिले याबद्दल त्यांचे आम्ही आभार मानतो. पण जे शासन स्तरावर तबल ७७ लाख कुक्कुटपालन व्यवसायाचा २४ टक्के वाटा मिळत असताना देखील शासकीय अध्यादेशाती कृषी समकक्ष दर्जा व त्या अनुषंगाने येणाऱ्या सर्व सवलती आकारणी करावी अशी संघटनेची व शेतकरी बांधवांची मागणी आहे त्याची पुर्तता न झाल्यास राज्यभरात आंदोलन छेडले जाईल असा सूचक इशारा संघटनेचे अध्यक्ष अनिल खामकर यांनी शासकीय अधिकाऱ्यांना दिला आहे.

# २१ मार्च जागतिक मन दिनानिमित्त माथेरानच्या जंगलासमोर वाढती आव्हाने

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२१, माथेरान :** निसर्ग संपन्न, शांत आणि वाहन मुक्त पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेल्या माथेरानच्या जंगलांपुढे सध्या अनेक गंभीर आव्हाने उभी ठाकली आहेत. 'जागतिक वन दिन' (२१ मार्च) निमित्त या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.माथेरान हे एकेकाळी घनदाट जंगलांनी व्यापलेले ठिकाण म्हणून प्रसिद्ध होते.

मात्र, अलीकडच्या काळात येथे वन्यजीवनात घट होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. यामागे मानवनिर्मित अनेक कारणे जबाबदार असून, त्याचा थेट परिणाम पर्यावरणीय सम तोलावर होत आहे.पर्यटकांच्या वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे घोडे हा त्यातील एक महत्त्वाचा मुद्दा ठरत आहे. घोड्यांच्या लीदीचे योग्य व्यवस्थापन होत नसल्याने ती रस्त्यावर व जंगलात साचते. यामध्ये प्लास्टिक मिसळल्यामुळे मातीचे प्रदूषण वाढते आणि जमिनीची सुपीकता कमी होते. परिणामी वनस्पती व सूक्ष्म जीवांवर विपरीत परिणाम होत आहे.जंगलात वाढता प्लास्टिक कचरा ही देखील गंभीर समस्या बनली आहे. पर्यटक तसेच काही स्थानिकांकडून वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वस्तू जंगलात फेकल्या जातात. यामुळे प्राणी त्या कचऱ्याच्या संपर्कात येऊन आजारी पडतात किंवा त्यांचा मृत्यू होण्याची शक्यता वाढते. काही ठिकाणी रेतीच्या गोण्या व बांधकाम साहित्य जंगलातच पडून राहिल्याने नैसर्गिक परिसंस्था बिघडत आहे. याशिवाय, माथेरानमध्ये वाढते काँक्रीटीकरण ही चिंतेचा विषय ठरत आहे. अनेक जुन्या बंगल्यांचे हॉटेलमध्ये रूपांतर होत असताना मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड केली जाते.

स्थानिक नागरिकांकडूनही घरबांधणी करताना झाडांची तोड वाढत असल्याचे चित्र आहे. ही स्थिती वेळीच रोखली नाही, तर माथेरानचा हिरवागार चेहरा नष्ट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.वृक्षारोपणाच्या नावाखाली केवळ औपचारिकता पूर्ण केली जाते, ही देखील वास्तव स्थिती आहे. लावलेल्या झाडांचे संगोपन व संरक्षण होत नसल्याने अशा उपक्रमांचा अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. खरे वनसंवर्धन म्हणजे केवळ झाडे लावणे नव्हे, तर त्यांचे दीर्घकालीन संरक्षण करणे होय.

माथेरानसारख्या पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात वन विभागाची भूमि का अत्यंत महत्त्वाची आहे. वनसंवर्धनासाठी विविध योजना राबविल्या जात असल्या, तरी प्रत्यक्षात त्यांचा प्रभाव मर्यादित असल्याची भावना स्थानिक नागरिकांमध्ये आहे. विशेषतः वाढती वृक्षतोड, अनधिकृत बांधकामे आणि बंगल्यांचे हॉटेलमध्ये रूपांतर होत असताना



आवश्यक ती कडक कारवाई होत नसल्याचे चित्र आहे. तसेच, 'जागतिक वन दिन' हा केवळ औपचारिकता न राहता प्रत्यक्ष कृतीचा दिवस ठरायला हवा. अशा दिवशी वन विभागाने पुढाकार घेऊन जनजागृती, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचे ठोस उपक्रम राबविणे अपेक्षित असते. मात्र, स्थानिक स्तरावर अशा उपक्रमांची ठळक अंमलबजावणी दिसून येत नसल्याने वनसंवर्धनाबाबतची गंभीरता कितपत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.'जागतिक वन दिना'च्या निमित्ताने केवळ कार्यक्रम न करता प्रत्यक्ष कृती करण्याची गरज आहे. घोड्यांच्या लीदीचे वैज्ञानिक व्यवस्थापन, प्लास्टिकवर कठोर नियंत्रण, अनधिकृत वृक्षतोडीवर आळा आणि प्रभावी वृक्षसंवर्धन यासाठी प्रशासन व नागरिकांनी एकत्र येणे आवश्यक आहे. आज योग्य पावले उचलली, तरच उद्याचे माथेरान हिरवेगार आणि समृद्ध राहील. अन्यथा, निसर्गाची ही आर्त हाक केवळ शब्दांतच मर्यादित राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

# सी फॉर चंद्रपूर म्हणजेच सी फॉर चॅम्पियन - आ.मुनगंटीवार

## आ.मुनगंटीवार यांनी सन्मित्र सैनिक विद्यालयाच्या पासिंग आऊट परेडमध्ये विद्यार्थ्यांना दिला प्रेरणादायी संदेश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** सी फॉर चंद्रपूर म्हणजेच सी फॉर चॅम्पियन हा प्रेरणादायी मंत्र देत, राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, शिस्त आणि सम र्पणाच्या बळावर जीवनात यश मिळविण्याचे मार्गदर्शन केले. सन्मित्र सैनिक विद्यालयाच्या पासिंग आऊट परेड कार्यक्रमात बोलताना त्यांनी चंद्रपूरच्या सेवाभाव, पराक्रम आणि राष्ट्रप्रेमाच्या परंपरेचा उल्लेख करत विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी आ.मुनगंटीवार यांनी शुभेच्छा दिल्या.

सन्मित्र सैनिक विद्यालयाच्या वतीने आयोजित पासिंग आऊट परेड कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव ॲड. निलेशजी चोरे, सहसचिव नितीनजी कुमरवार, सदस्य बिपीन देशपांडे, प्राचार्य अरुंधती कावडकर, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. मुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की,चंद्रपूर ही केवळ भौगोलिक ओळख नसून सेवाभाव, पराक्रम आणि राष्ट्रप्रेम ाच्या तेजाने पावन झालेली प्रेरणादायी भूमी आहे. थोर सम ाजसेवक बाबा आमटे यांच्या आनंदवनाच्या माध्यमातून सेवाभावाने प्रेरित, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषित-वंचितांना चंद्रपूर येथे धम्मदीक्षा देऊन पावन केलेली, जगातील सर्वाधिक वाघांची ओळख असलेली आणि देशासाठी सर्वाधिक सोनं दान करणाऱ्या पराक्रम ाची साक्ष देणारी ही चंद्रपूरची



पवित्र भूमी आहे. सेवा, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेचा समृद्ध वारसा लाभलेल्या या भूमीत शिक्षण घेणे हे विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने भाग्याची बाब आहे.

अशा प्रेरणादायी वातावरणात घडणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये सेवाभाव, पराक्रम आणि राष्ट्रप्रेमाची जाणीव आपोआप रुजते आणि तेच त्यांना आयुष्यात पुढे नेणारे बळ ठरते, असा विश्वास यावेळी आ.मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

सी फॉर चंद्रपूर म्हणजेच 'सी फॉर चॅम्पियन' व्हा, असे आवाहन करत त्यांनी विद्यार्थ्यांना सेवाभाव, शिस्त आणि समर्पण अंगीकारण्याचे सांगितले.यावेळी आ. म ुनगंटीवार यांच्या हस्ते भगवा ध्वज फडकवण्यात आला.

भगवा म्हणजे भयरहित, गर्वरहित आणि वासनारहित जीवनाचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणा प्रताप यांच्या आदर्शांचा उल्लेख करत, सत्य आणि धर्माच्या मार्गावर चालण्याचे आवाहन आ.म ुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांना केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आ.मुनगंटीवार यांनी योगी अरविंद यांच्या विचारांचा उल्लेख केला.

कोणतेही काम ईश्वराची अर्चना समजून करा, असे सांगत त्यांनी मेहनत, शिस्त आणि समर्पणाच्या बळावर कोणत्याही संकटावर मात करता येते, असा विश्वास व्यक्त केला.

सन्मित्र सैनिक विद्यालय हे केवळ शिक्षण देणारे नसून राष्ट्रभक्ती आणि संस्कार घडवणारे केंद्र असल्याचे आ.म ुनगंटीवार यांनी नमूद केले.

# थोडक्यात

## एकाच किमतीच्या नाण्यांचे अनेक प्रकार; सर्वसामान्यांची वाढती कोंडी



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२१, जुईनगर (नवी मुंबई) :** सध्या बाजारात एकाच किमतीच्या नाण्यांचे अनेक प्रकार प्रचलित असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. एक रुपया, दोन रुपये, ५ रुपये आणि १० रुपयांच्या नाण्यांचे विविध आकार, जाडी आणि डिझाइन पाहायला मिळत असल्याने नाणी ओळखणे आणि मोजणे अधिक कठीण झाले आहे. पूर्वीच्या काळात नाण्यांची रचना ठराविक असायची. १ पैसा, २ पैसे, ५ पैसे, १० पैसे, २० पैसे, २५ पैसे, ५० पैसे आणि १ रुपया ही नाणी अनेक वर्षे एकाच आकारात तयार केली जात. फक्त वर्ष (साल) बदलले जाई, मात्र नाण्याचा प्रकार किंवा आकार कायम एकसारखाच ठेवला जात होता. त्यामुळे व्यवहार करताना कोणतीही अडचण येत नव्हती. मात्र सध्याच्या काळात एकाच किमतीच्या नाण्यांचे वेगवेगळे प्रकार बाजारात आल्याने लोकांना प्रत्येक नाणे नीट पाहून ओळखावे लागते. विशेषतः मंदिरे, धर्मादाय संस्था किंवा दानपेट्या उघडताना नाणी मोजण्याचे काम अधिक वेळखाऊ ठरत आहे. यामुळे कामगारांची तारांबळ उडत असल्याचे चित्र आहे. जुईनगर येथील समाजसेवक श्रीधर मढवी यांनी या संदर्भात आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, एकाच किमतीच्या नाण्यांचे वेगवेगळे प्रकार बनवण्यामागे सरकारचा नेमका हेतू काय आहे, हे समजत नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होते. नाण्यांचा आकार एकसारखा ठेवला तर ओळखणे आणि मोजणे सोपे जाईल. तसेच अंध आणि कमी दृष्टी असलेल्या व्यक्तींनाही याचा फायदा होईल.

त्यांनी पुढे असेही नमूद केले की, नाण्यांचे वेगवेगळे प्रकार तयार करताना प्रत्येक वेळी नवीन डाय (छाप) तयार करावी लागते, ज्यामुळे खर्च वाढतो. त्यामुळे एकसारखा आकार ठेवला तर उत्पादन खर्चातही बचत होऊ शकते. याशिवाय, काही वर्षांपूर्वी २००० रुपयांच्या नोटा बंद करण्याच्या निर्णयानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा संदर्भ देत त्यांनी सरकारने अशा निर्णयांपूर्वी व्यापक विचार करण्याची गरज असल्याचे ही सांगितले. श्रीधर मढवी यांनी ही बाब पंतप्रधानांपर्यंत पोहोचवण्याचा निर्णय घेतला असून, सर्वसामान्यांच्या सोयीचा विचार करून नाण्यांच्या रचनेत एकसारखेपणा आणावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## ईदच्या दिवशी जिंतूर तालुक्यात बत्ती गुल; नागरिकांमध्ये संताप



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२१, जिंतूर (परभणी) :** ईद-उल-फित्रच्या पवित्र सणाच्या दिवशी जिंतूर तालुक्यातील अनेक भागात वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. सणाच्या दिवशी नमाज, पाहुणचार व विविध धार्मिक कार्यक्रमांची तयारी सुरू असताना अचानक वीज गेल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. विशेषतः सकाळपासूनच काही भागांत 'बत्तीगुल' झाल्याने घरगुती कामकाज, पाणीपुरवठा व इतर आवश्यक सेवा विस्कळीत झाल्या. उष्णतेच्या पार्श्वभूमीवर लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागला.

नागरिकांनी वीज वितरण विभागाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, सणासुदीच्या दिवशी ही वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरल्याची टीका केली जात आहे. ईदसारख्या महत्त्वाच्या सणाच्या दिवशी तरी योग्य नियोजन करून अखंडित वीजपुरवठा द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, संबंधित विभागाने तातडीने याची दखल घेऊन वीजपुरवठा पूर्ववत करावा व भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ही पुढे येत आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर उत्साहात संपन्न

## बामणी येथे नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२१, जिंतूर (परभणी) :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर बामणी मंडळात दिनांक २० मार्च २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालय बामणी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. उपविभागीय अधिकारी सेलू शैलेश लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिंतूरच्या तहसीलदार शितल कच्छवे या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार प्रशांत राखे, तालुका कृषी अधिकारी नितीन घुगे, उपसरपंच सुनीताबाई जाधव (बामणी), सरपंच सावित्रीबाई घोगरे (करंजी), उपसरपंच नारायण राठोड (असोला), सरपंच लक्ष्मीबाई जाधव (अंगलगाव) तसेच सरपंच भीमराव वाकळे (पिंपळगाव काजळे) उपस्थित होते. यावेळी बामणी मंडळाच्या मंडळ अधिकारी श्रीमती आरती शेळके, सर्व ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, प्रतिष्ठित नागरिक व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

शिबिरामध्ये नागरिकांना विविध महसूल सेवा तत्काळ उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये प्रमाणपत्रे व विविध दाखले, ७/१२ व ८-अ उतारे, फेरफार प्रकरणे, नोंदीतील चुका दुरुस्ती, जमीन अभिलेख अद्ययावत करणे तसेच अकृषिक (छअ) संदर्भातील मार्गदर्शन यांचा समावेश होता. तसेच जमीन विषयक प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. यासोबतच नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती देत सामाजिक योजनांचा लाभ, ई-मोजणी अर्ज प्रक्रिया, तसेच पी.एम. किसान नोंदणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिरात आरोग्य, कृषी, मुद्रांक व नोंदणी, पुरवठा आदी विभागांनी स्वतंत्र माहिती कक्ष उभारून नागरिकांना सविस्तर माहिती दिली. तहसीलदार शितल कच्छवे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांना त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या शिबिराला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध सेवांचा लाभ घेतला. एकूणच हा उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.